पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर – ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दूरध्वनी क्र.०२१७-२७४४७७१ / ७२ / (११ लाईन्स), फॅक्स: ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: www.sus.ac.in ई-मेल: dypreexam@sus.ac.in



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022 'B++' Grade (CGPA 2.96)


जा.क्र.पुअहोसोविसो/प.व मू.मं./२०२६/ 142

दिनांक : 11 FEB 2026

परिपत्रक क्रं.- 04 /२०२६

**बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक व भरारी पथकासाठी शिक्षकांची माहिती पाठविणेबाबत**

सर्व संलग्नित महाविद्यालयातील मा.प्राचार्य/संचालक यांना या परिपत्रकाद्वारे आदेशान्वये कळविण्यात येते की, **माहे मार्च/एप्रिल-२०२५** या परीक्षा हंगामातील विद्यापीठीय विविध विद्याशाखातंर्गत संभाव्य परीक्षांचे आयोजन **मार्च-२०२६** मध्ये करण्यात येणार आहे.

आपण संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक, हे केंद्र प्रमुख म्हणून कार्यरत राहणार आहात. त्यानुषंगाने मार्च/एप्रिल-२०२६ या परीक्षा हंगामातील परीक्षेसाठी परीक्षा केंद्रावर **बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक व भरारी पथक** (Flying Squad) म्हणून संबंधित परीक्षा केंद्रावर परीक्षा कालावधीत उपस्थित राहण्यासाठी आपल्या महाविद्यालय/ मान्यता प्राप्त संस्थेमधील कार्यरत अनुभवी विद्यापीठ मान्यता प्राप्त शिक्षकांचे नामनिर्देशन U.O.8 (4) प्रमाणे होवून मिळावे. त्याकरीता, आपल्या महाविद्यालय/मान्यता प्राप्त संस्थेमधील शिक्षकांची नावे **दि. २८ फेब्रूवारी, २०२६ पर्यंत** सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये भरुन dypreexam@sus.ac.in या ईमेलवर प्रथम **Soft Copy** व नंतर **Hard Copy** पाठवून दयावी.

वर नमूद केलेल्या मुदतीत संबंधित महाविद्यालयाकडून बहिस्थ: वरिष्ठ पर्यवेक्षक व भरारी पथक (Flying Squad) यासाठी शिक्षकांची नावे प्राप्त न झाल्यास विद्यापीठ प्रशासन संबंधित महाविद्यालयातील शिक्षकांच्या यादीमधून बहिस्थ: वरिष्ठ पर्यवेक्षक व भरारी पथक (Flying Squad) म्हणून शिक्षकांचे नामनिर्देशन करुन, आदेश निर्गमित करण्यात येतील, याची सर्व प्राचार्यांनी नोंद घ्यावी. तसेच आपण दिलेल्या शिक्षकांच्या नावामध्ये कोणत्याही कारणास्तव बदल केला जाणार नाही. ज्या सेशन मध्ये संबंधित बहिस्थ: वरिष्ठ पर्यवेक्षक व भरारी पथक (Flying Squad) यांची आपल्याकडून प्राप्त झालेल्या शिक्षकांची नावे विद्यापीठ निर्देशित करेल त्या संबंधिताना सदर परीक्षा कालावधीत आपले कार्य महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ४८ (४) नुसार करणे अनिवार्य आहे, याची नोंद घ्यावी.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**सोबत-वरीलप्रमाणे**

**जावक क्रं. : पुअहोसोविसो/परीक्षा व मूल्यमापन/वेळापत्रक/२०२६/**
**दिनांक :**

**प्रत- माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव**

मा.प्राचार्य, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.